MHJG210012242024

## निशाणी क्र.१ खालील आदेश

(दिनेश तायडे व ईतर **विरुध्द** निरंक)

प्रस्तुत अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मुंबई नियमन (Regulation) अधिनियम, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज वाचला व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०३.** अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या वतीने अर्जदार क्र. १ दिनेश वावधन तायडे यांनी निशाणी क्र. ११–अ प्रमाणे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये मूळ अर्जातील कथनांचा पुर्नरुच्चार केलेला आहे. अर्जदारांच्या वतीने निशाणी क्र. १७ प्रमाणे साक्षीदार क्र. २ प्रविण रोहिदास पांचाळ यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यात आलेली असून सदर साक्षीदाराने देखील अर्जदार क्र.१ प्रमाणे आपली साक्ष नोंदवून त्यास पुष्टी दिलेली आहे.

**०४.** अर्जदारांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या साक्षीपुराव्याचे व कागदोपत्री पुराव्यामधील मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, मयत वावधन सुका तायडे हे दिनांक २२.११.२०१३ रोजी व मयत यांची पत्नी सुशिला वावधन तायडे ह्या दिनांक ३०.०७.२००५ रोजी मौजे कासवे, ता. यावल, जि. जळगांव येथे मयत झालेले आहेत. त्याचप्रमाणे, मयत यांची आई सिताबाई सुखा तायडे ह्या दिनांक १४.०७.२०१४ रोजी मौजे कासवे, ता. यावल, जि. जळगांव येथे मयत झालेले असल्याचे दिसुन येते.

**०५.** अर्जदारांच्या मागणीबाबत निशाणी क्र. १६ प्रमाणे दिनांक ०७.१२.२०२४ रोजीच्या दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले असून त्याद्वारे मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणी वारस असतील तर त्यांनी त्यांच्या हरकती कळविण्याबाबत जाहीर करण्यात आले होते. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही

अर्जदारांच्या मागणीबाबत मुदतीमध्ये कोणीही हरकत वा आक्षेप दाखल केलेला नाही; त्यामुळे, अर्जदारांचा संपुर्ण साक्षीपुरावा विनाप्रतिवादीत व विनाआव्हानित राहिलेला आहे.

**०६.** सबब, अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे व अर्जदारांतर्फे सादर करण्यात आलेला साक्षीपुरावा याचा सारासार विचार करता असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ व २ मुले आणि अर्जदार क्र. ३ मुलगी या नात्याने मयत वावधन सुका तायडे आणि सुशिला वावधन तायडे यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. म्हणून, वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देणे योग्य व उचित होईल. सबब, न्यायाच्या दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जदार क्र. १. दिनेश वावधन तायडे, २. गणेश वावधन तायो व ३. ज्योती ललितकुमार सोनवणे हे मयत वावधन सुखा तायडे आणि सुशिला वावधन तायडे यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देण्यात यावे.

**०३**. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या हक्कात देण्यात येणारे वारस प्रमाणपत्र हे केवळ मुंबई नियमन (Regulation) अधिनियम, १८२७ मधील तरतुदीस अधीन राहुन देण्यात येत असुन सदर वारस प्रमाणपत्राचा वापर वरील नमुद मयताच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतींच्या संदर्भात करता येणार नाही.

**०४**. अर्जदारांनी नियमाप्रमाणे आवश्यक न्यायालयीन शुल्क भरणा करावे.

(खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आले.)

RAJNIKANT SHESHERAO JAGTAP
Digitally signed by RAJNIKANT SHESHERAO JAGTAP
Date: 2026.06.18 16:42:59 +0530

(रजनिकांत शे.जगताप)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
यावल.

दिनांकः १८/०६/२०२६